RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

**वर्ष ८, अंक ५९]** **बुधवार, जून २२, २०२२/आषाढ १, शके १९४४** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००**

**असाधारण क्रमांक १४१**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### जलसंपदा विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जून २०२२

**अधिसूचना क्रमांक २**

[(संदर्भ कलम १४(१)]

**धरण सुरक्षा कायदा, २०२१.**

क्रमांक संकीर्ण २०२२/प्र.क्र. ४९/२०२२/सिंव्य कामे.— धरण सुरक्षा कायदा, २०२१ (२०२१ मधील ४१) प्रकरण ५ मधील कलम १४ उप कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र राज्यासाठी पुढीलप्रमाणे धरण सुरक्षा संघटनेस अभिप्रेत अधिकार व कर्तव्य पार पाडण्यासाठी राज्य धरण सुरक्षा संघटना या संघटनेची स्थापना करीत आहे. सदरच्या संघटनेमध्ये पुढीलप्रमाणे नमूद अधिकारी यांची संरचना कार्यरत असेल. सदर संघटना दिनांक २२ जून २०२२ या तारखेपासून कार्यान्वित करण्यात येत आहे :—

| अ.क्र. (१) | पदनाम (२) |
|---|---|
| १ | मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक |
| २ | अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षितता संघटना, नाशिक |
| ३ | कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता विभाग-१, नाशिक |
| ४ | कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता विभाग-२, नाशिक |
| ५ | कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता विभाग-३, नाशिक |
| ६ | कार्यकारी अभियंता, कालवे व सुरक्षितता विभाग, नाशिक |
| ७ | कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता कक्ष, नाशिक (धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प टप्पा-२) (ड्रीप-२) |
| ८ | संशोधन अधिकारी, उपकरणे संशोधन विभाग नाशिक |

(१) राज्य धरण सुरक्षितता, संघटना जलसंपदा विभागाच्या धरण सुरक्षिततेशी संबंधित तांत्रिक विभाग प्रमुख म्हणजे सचिव (लाभ क्षेत्र विकास), मंत्रालय, मुंबई यांना जबाबदार असेल व त्यांचेकडे अहवाल सादर करेल.

(२) राज्य धरण सुरक्षितता संघटनेची रचना व कार्यपद्धती ही राज्य शासनाने विहित केल्यानुसार असेल.

(३) राज्य धरण सुरक्षितता संघटनेवर होणारा प्रशासकीय व इतर खर्च हा राज्य शासनाच्या निधीतून होईल.

(४) निर्दिष्ट धरणांच्या संख्येच्या अनुषंगाने राज्य धरण सुरक्षितता संघटनेस विहित कर्तव्ये व कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी उचित मनुष्यबळाची व्यवस्था राज्य शासनामार्फत केली जाईल. की जेणेकरून सदर मनुष्यबळामध्ये समाविष्ट अधिकारी व कर्मचारी यांचेकडे राज्य शासनाने विहित केल्यानुसार धरण संकल्पन, हायड्रोमेकॅनिकल इंजिनियरींग, जलशास्त्र, धरण उपकरणे, धरण पुनर्स्थापना किंवा इतर तत्सम क्षेत्राशी निगडीत पात्रता व अनुभव असेल.

(५) राज्य धरण सुरक्षितता संघटनेत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची कार्ये व अधिकार राज्य शासनाने विहित केल्यानुसार असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**किरण कुलकर्णी,**

शासनाचे सचिव (लाक्षेवि).

## WATER RESOURCES DEPARTMENT

Mantralaya. Mumbai 400 032. dated the 22nd June 2022

*NOTIFICATION-2*

[(*See* Section 14(*1*)]

DAM SAFETY ACT, 2021.

No. Mise 2022/(49/2022) IM (W).– In exercise of the powers conferred by sub-section (*1* ) of section 14 of Act, Dam Safety 2021 (41 of 2021) the Government of Maharashtra hereby establishes an Organisation to be known as the State Dam Safety Organisation to discharge the powers & functions of State Dam Safety Organisation under the said Act. and hereby appoints on the 22 June 2022 as the date on which the said Organisation shall come into force .

The Structure of the mentioned officers will be functioning in this Organisation is as below :—

| No. (1) | Designation (2) |
|---|---|
| 1 | Chief Engineer, Hydrology & Dam Safety, Water Resources Department. Nashik |
| 2 | Superintending Engineer. Dam Safety Organisation . Nashik |
| 3 | Executive Engineer. Dam Safety Organisation-1 . Nashik |
| 4 | Executive Engineer. Dam Safety Organisation-2 . Nashik |
| 5 | Executive Engineer. Dam Safety Organisation-3 . Nashik |
| 6 | xecutive Engineer. Canel Safety Department . Nashik |
| 7 | Executive Engineer. Dam Safety Desk , Nashik (Dam Rehabilitation &lmprovement Project-II) (DRIP-II) |
| 8 | Research Officer. Equipment Research Department. Nashik |

(1) fhe State Dam Safety Organisation shall be responsible to. and report to the technical head of the Department Secretary (CAD). Mantralaya. Mumbai dealing with Dam Safety.

(2) The organisational struture and work procedures of the State Dam Safety Organisation shall be such as may be prescribed by the State Government.

(3) The administrative and other expenses of State Dam Safety Organisation shall be borne by the State Government.

(4) The State Government shall having regard to the number of specified dams in that State, provide such number of officers and employees to the State Dam Safety Organisation as it may consider neccessary for the efficient functioning of the said Organisation.

Provided that the officers and employees shall have such qualifications and experience in the field of dam safety including dam-design, hydro-mechanical engineering, hydrology, geo-technical investigation, instrumentation . dam rehabilitation or such other field as may be prescribed by the State Government.

(5) The functions and powers of the officers and employees appointed in State Dam Safety Organisation shall be such as may be prescribed by the State Government.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KIRAN KULKARNI,
Secretary (CAD) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.